# 'आयसीएआर'च्या स्थापनादिनी महिलांचा प्रतिसाद

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : भायेगाव (ता.जि. नांदेड) येथे पोखर्णी कृषी विज्ञान विज्ञान केंद्रातर्फे भारतीय कृषी अनुसंधान परिषद स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी भायेगाव गावातील १५० महिला, शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यामध्ये गावातील सरपंच, कृषी सखी, बचत गटांचे सचिव, अध्यक्षा उपस्थित होत्या.

या वेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांनी विविध कृषी विज्ञान केंद्र व त्यातील शास्त्रज्ञ या सर्वांची कार्यप्रणाली, तसेच रोपवाटिका, फळबाग आणि फुलबाग क्षेत्रातील उद्योगाच्या संधी आणि शेतीला जोड व्यवसाय याबद्दलही मार्गदर्शन केले. त्यानंतर पशुविद्या तज्ज्ञ डॉ. महेश अंबोरे यांनी पशू संगोपन, कुक्कुटपालन आणि शेळीपालन तसेच जनावरांच्या आहार आणि आरोग्याबद्दल मार्गदर्शन केले. काही यशोगाथाच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहित करून कृषी विज्ञान केंद्रात घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणा बद्दल देखील माहिती दिली. गृह विज्ञान तज्ज्ञ अलका पवळे पाटील यांनी महिला विकास, आरोग्य व आहार, लघुउद्योग व गृह उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, सेंद्रिय परसबाग, शिवणकाम, भरतकाम अशा विविध उद्योगाच्या संधीबद्दल माहिती दिली. शेती काम करताना महिलांना होणारा त्रास कमी व्हावा त्यासाठी कष्ट कमी करणाऱ्या यंत्रांचे देखील महिलांना माहिती देण्यात आली. महिला आणि शास्त्रज्ञ परिसंवादानंतर महिलांना पेरू, करवंद रोपे आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी बाह्य परजीवी नियंत्रणासाठी सेंद्रिय आणि रासायनिक औषधाचे वाटप करण्यात आले.